श्री. शिरिष ग. जोशी(अध्यक्ष) || श्री व्याघ्रेश्वर प्रसन्न || श्री जगदिश ग. रानडे(खजिनदार)

९०३५५८६११० **श्री व्याघ्रेश्वर कुलस्वामी परिवार** ९८५०६६६५८९

द्वारा : श्री धनंजय श्री रानडे, कार्यवाह

४ रमा माधव, १०५/२, नारायण पेठ, पुणे - ४११०३०.

फोन : (०२०) ९८२२२९५६१० / ९४२३१३८३६५ / आसूद दूरध्वनी :

**व्रत सेवेचे - भक्तीचे - ज्ञानाचे**

Website : www.vyaghreshvar.com रजि नं.:एफ - २२१४ Email : svkp.pune@gmail.com

---

दि. ४ फेब्रुवारी २०२४

**महाशिवरात्री उत्सव निमंत्रण पत्रक ... वर्षे ४३ महाशिवरात्री उत्सव २०२४.**

प्रति,

**मा. सभासद, श्री व्याघ्रेश्वर कुलस्वामी परिवार, पुणे**

सप्रेम नमस्कार,

यंदाच्या वर्षीचा महाशिवरात्री उत्सव सोहोळा "माघ कृष्ण १३ शके १९४५", शुक्रवार दिनांक ८ मार्च २०२४ आणि पारणं व महाप्रसाद शनिवार दि. ९ मार्च २०२४, या दिवशी “श्री देव व्याघ्रेश्वर मंदीर”, आसूद, ता. दापोली, जि. रत्नागिरी येथे आपल्या परिवारातर्फे साजरा होणार आहे.

**उत्सव देणगी शुल्क** म्हणून **रु. ६००/ प्रति व्यक्ती** आकारली आहे. (सात वर्षांखालील मुलांसाठी उत्सव शुल्क नाही.)

भक्तांचे वाहन घेऊन येणाऱ्या बसेस, कार इ. वाहनांचे चालकांसाठी उत्सव देणगी पासेस काउंटरवरून चालकाचे नाव, पत्ता व गाडी नंबर देऊन संबंधीत गाडी मालकानेच रू. ६०० / प्रती चालक भरून घ्यावेत. परस्पर ड्रायव्हरला पाठविल्यास पास दिला जाणार नाही.

**आणखी आणि तितकेच महत्वाचे :** प्रत्येक गाडी मालकाने आपापल्या गाडीच्या चालकाला एक विनंती वजा सूचना नक्की द्यावी भक्त निवासाचे आवार सोडून इतरत्र फिरायला जाऊ नये. आवश्यकता भासेल तेंव्हा उपस्थित वयस्कर भक्तांना भक्तनिवास ते मंदिर व मंदिर ते भक्तनिवास नेण्या - आणण्याची मदत करावी

हे **“उत्सव देणगी शुल्क” संपूर्ण महाशिवरात्री उत्सवासाठी एकत्रित व प्रतिव्यक्ति शुल्क आहे तसेच ते भरून त्याचे कुपन घेणे, हे अनिवार्य आहे**. उपस्थित भक्तांची, भक्तनिवास येथील **एकत्रित निवास** तसेच दि. ७ मार्च रोजीचे रात्रीचे भोजन, दि. ८ मार्च रोजी महाशिवरात्रीचा दोन्ही वेळचा फराळ, चहा-कॉफी इ. तसेच दि. ९ मार्च रोजीचा सकाळची चहा-कॉफी व महाप्रसादाचे भोजन अशी एकूण व्यवस्था सदर देणगी शुल्कात समावेश केलेली आहे.

उपस्थित राहू इच्छिणाऱ्या सर्वानीच पत्रकात दिलेल्या न्यासाच्या खात्यात / अथवा **upi id 11133810@cbin** / अथवा पत्रकातील QR code स्कॅन करून Gpay, Bheem, Phone pay यावर दि. २९ फेब्रुवारी २०२४ पर्यंत आगाऊ उत्सव देणगी मूल्य भरणे अवश्यक आहे. **(न्यासविरोधी कार्यामुळे, न्यासातून निलंबित केलेल्या सदस्यांनी उत्सव देणगी शुल्क online / offline भरले तरी ते ग्राह्य धरले जाणार नाही. निलंबित सदस्यांना, उत्सव काळात subsidized उत्सव देणगी शुल्कात, न्यासाच्या भक्तांसाठी उपलब्ध करून देत असलेल्या खानपान सेवेचा लाभ घेण्यासाठी; न्यासाच्या भोजनकक्षात तसेच भक्तनिवासाच्या आवारात प्रवेश मिळणार नाही याची संबंधितांनी दखल घेणे आवश्यक आहे.)**
उपस्थित राहणाऱ्यां सभासदांनी कृपया आधी (२९ फेब्रुवारी पर्यंत) कळवावे ही नम्र विनंती .. त्यानुसार आम्हाला व्यवस्था ठेवायला सोपे होईल.

**दिनांक २९/२/२०२४ रोजी पर्यंत उत्सव देणगी शुल्क भरल्यासच वर नमूद केलेले शुल्क रु. ६०० / प्रती व्यक्ती आकारले जातील त्यानंतर रक्कम भरणा करणाऱ्यांसाठी उत्सव शुल्क रु. ७००/ प्रती व्यक्ती राहील याची नोंद घ्यावी ही विनंती.** आपण उत्सव देणगी शुल्क रक्कम भरल्याची व आपल्या उपस्थितीची माहिती रक्कम भरल्यावर त्वरीत त्याची पावती किंवा स्क्रिनशॉट व्हाट्सएप / एस एम एस किंवा दूरध्वनीवर परिवार न्यासाचे कार्यवाह श्री. धनंजय रानडे यांना ९८२२२९५६१० या क्रमांकावर अथवा सहकार्यवाह श्री. श्रीनिवास रानडे यांना ९८२२९६२४५४ या क्रमांकावर कळवावी ही विनंती. ज्यांनी आगाऊ उत्सव देणगी शुल्क भरले असेल त्यांचीच व्यवस्था भक्तनिवासात करता येईल. जे न कळवता येतील त्यांची सोय उपलब्धतेनुसार करण्यात येईल .. असो ..

महाशिवरात्री उत्सव कालावधीत येणाऱ्या भक्तांच्या निवासाची सोय आपल्या आसूद येथील “शिवालय” ( यात फक्त ७५ वर्षावरील जेष्ठ महिला व पुरुष भक्त तसेच शिवालय उभारणीसाठी गुंतवणूक करणारे ह्यांनी स्वत: उपस्थिती लावली असल्यास त्यांची .. शेअर पद्धतीने), मूळ निवासस्थान व खास उभारण्यात येणाऱ्या मंडपात एकत्रित सहनिवास पद्धतीने केली जाते. भक्तांनी महाशिवरात्री दरम्यान रात्री पडणारी थंडी लक्षात घेउन स्वत:बरोबर पुरेसे अंथरुण व पांघरुण येताना आणावे. प्रत्येकाने आपली औषधे बॅटरी इ. बरोबर आणावी .... **वय वर्षे ७५ पूर्ण केलेले जेष्ठ नागरिक / Physical disability असलेले सदस्य यांच्या व्यतिरिक्त कोणालाही कुठल्याही कारणासाठी शिवालयात निवास करता येणार नाही याची नोंद घ्यावी व त्याबाबत कोणतेही वादविवाद उत्सवाच्या वेळी करू नयेत हि नम्र विनंती ... जय व्याघ्रेश्वर !!!**

आता उत्सव कार्यक्रमा विषयी ..

**यंदाही नेहमी प्रमाणे श्री व्याघ्रेश्वर मंदिरात “लघुरुद्रासह सहस्त्रधारा” अभिषेकाचे शेवटचे आवर्तनास सुरुवात झाली की, "नवसाला" हमखास पावणारा "श्रीं" चा जयघोषातला पालखी सोहोळा संपन्न होईल.**
"श्रीं" च्या चांदीच्या मुखवट्याची विश्वस्त मंडळ व भक्त मंडळी यांचेकडून पुजा संपन्न झाल्यावर परिवाराचे अध्यक्ष, कार्यकर्ते आणि भक्तांच्या मदतीने, “श्रीं”ची पालखी नामघोषात भक्तनिवासातून मंदिरात मिरवत आणतील मंदिर परिसरातील तीन प्रदक्षिणा झाल्यावर कमानी जवळ आपल्या परिवारातील पाच सुवासिनी पालखीला ओवाळतील त्या नंतर लघुरुद्राचे आणि पालखीचे यजमान कमान ते गर्भगृहापर्यंत पालखी सन्मानाने आणतील .... **जय व्याघ्रेश्वर !!!**

श्री व्याघेश्वर कुलस्वामी परिवार भक्तनिवास प्रांगणात, शुक्रवार दि. ८ मार्च २०२४ (महाशिवरात्रचे दिवशी) रोजी सायं ४.०० वा न्यासाची वार्षिक सर्वसाधारण घेण्यात येणार आहे. सर्व उपस्थित न्यास सभासदांनी सभेस उपस्थित राहून मौलिक सूचनांची देवाण घेवाण करून न्यासाच्या चर्चेत सहभागी व्हावे ही विनंती .. जय व्याघ्रेश्वर !!!

त्यानंतर सायंकाळी ६.१५ ते रात्री ९.३० चे दरम्यान, परिवाराचा खास सांगीतिक व मनोरंजनाचा बहारदार कार्यक्रम होईल. सौ. दिपलक्ष्मी रानडे (संपर्क ९९२२७३१९३५) व सौ. चित्रा जोशी (संपर्क ९११३२४०६४०) या कार्यक्रमाच्या संयोजक आहेत. कुणाला सदर कार्यक्रमात सहभागी व्हायचे असल्यास २० फेब्रुवारी २०२४ पूर्वी तुमची नावनोंदणी करणे आवश्यक आहे. ऐनवेळी आलेल्या विनंतीचा वेळेच्या उपलाब्धतेनुसारच विचार करण्यात येईल हे समजून घ्यावे हि विनंती.

त्यानंतर रात्रीचा फराळ झाला की रात्री १० पासून ते श्री महाशिवरात्र अभिषेक पूजेपर्यंत; उपस्थितांशी संवाद साधत थोडसा कीर्तनाचा बाज असलेले व पौराणिक कथा ते सद्यस्थितीबाबत एक श्रवणीय प्रवचन सादर करणार आहोत. उपस्थितांनी प्रवचन व **ज्या कार्यक्रमासाठी आपण तिथे आवर्जून एकत्र येतो तो मुख्य विधी म्हणजे महाशिवरात्रीच्या शुभमुहूर्तावर 'श्रीं'चे पिंडीवर केला जाणारा महाभिषेक पूजा सोहळा याची देही याची डोळा बघण्याचा लाभ जरूर घ्यावा. निद्रा नित्याचीच आहे परंतु हा सोहोळा वर्षातून एकदाचा होतो ... जय व्याघ्रेश्वर !!!**

## <u>महाशिवरात्र उत्सव कार्यक्रम</u>

**शुक्रवार ८ मार्च २०२४**

| | |
|---|---|
| लघुरुद्रासह सहस्त्रधाराभिषेक व पालखी सोहळा.. | सकाळी ८.३० ते दुपारी १२.३० |
| सकाळचा (नाष्टा) फराळ आस्वाद .... | सकाळी ८:३० ते १०:३० (सकाळी १०.३० नंतर नाश्त्याचे counter बंद करण्यात येईल) |
| दुपारचा फराळाचा आस्वाद .... | दुपारी १२:४५ ते ३:३० |
| परिवाराचे वैचारिक देवाणघेवाण चर्चासत्र ... | दुपारी ४.३० ते ५.३० |
| परिवाराचा सांगीतिक व मनोरंजनाचा कार्यक्रम .. | सायंकाळी ६.१५ ते रात्री ९.१५ |
| रंगतदार कीर्तन / प्रवचन व श्री महाशिवरात्र महापूजा व आरती ... | रात्री ९.३० ते १२.३० |

**शनिवार ९ मार्च २०२४**

श्री सत्यनारायणाची महापूजा व आरती..... सकाळी ८.०० ते १०:००

श्रीं चा महाप्रसाद .... सकाळी १०.३० नंतर

**विविध शहरातुन प्रवासाच्या व्यवस्थेसाठी संबंधित प्रतिनिधींशी संपर्क साधावा**

पुणे श्री. जितेंद्र रानडे: -९०११० ३२१५२
मुंबई- श्री.नचिकेत रानडे : -९७६९३ ७४३४७
नाशिक- श्री. श्रीनिवास रानडे :-९८२२९ ६२४५४ / ९४०४२ १३१३१
गोवा - श्री. अनिल जोशी:- (०८३२) २३७४६३५ / ९४२३३०८६२६
नागपूर - - श्री देवेंद्र रानडे:- ९४२२१ ०५७३२
कर्नाटक - श्री. प्रदिप रानडे: -९४४८१ ३३७५७

**उत्सवकार्यात आपण या प्रकारे देखील मदत करू शकता**

#अ) पुढे दिलेल्या अंदाज पत्रकातील एखाद्या गोष्टीचा संपूर्ण / अंशत: खर्च स्वीकारून.
#ब) वस्तुरूप देणगी देउन. ( द्यायच्या वस्तु संदर्भात आगाऊ कळवावे ही विनंती )
#क) उत्सवकालात ज्या कामात मदत करण्याची इच्छा असेल; अशा कुठल्याही कामात व्यक्तीश: मदत करून.
#ड) मौजे आसुद येथे आपल्या परिवाराचे साधी व अद्ययावत अश्या दोनही प्रकारची सुविधा असणारे भक्तनिवास व 'शिवालय' या वास्तू आहेत, तेथे माफक दरात भोजन, चहा-नाष्टा व निवासाची वर्षभर उत्तम सोय केली आहे. तरी सर्व भक्तांना विनंती की त्यांनी व त्यांचे परिचितांनी फक्त आपल्या वास्तुतच उतरावे.
#इ) आपल्या ओळखीतील अशा व्यक्ती, की ज्यांचा कुलस्वामी श्री. व्याघ्रेश्वर आहे, अशा मंडळींना (माहेरवाशिणींसह) आपल्या परिवाराचे सभासद होण्यास प्रोत्साहित करावे. तसेच सभासद असलेल्या वडिलांनी आपल्या मुलांनाही (विशेषत: कमवत्या मुलांना / मुलींना) सभासद करून घ्यावे अशी आमची नम्र विनंती आहे.

**कार्यक्रमाचे अंदाजपत्रक :**

#१) मांडव खर्च (मुख्यतः) प्रायोजक कै. गो. का. रानडे यांचे कुटुंबिय
#२) वाडीच्या चक्क्याचे श्रीखंड: श्री. चं. ना. रानडे यांचे देणगीचे व्याजातून
#३) साजुक तुप शिरीष गजाननराव जोशी, बेळगाव
#४) नारळ, फणस इ. गोवेकर जोशी बांधव.
#५) राजगिरा वडी श्री. आनंद (नंदू) रानडे, पुणे
#६) महाप्रसादातील गोड पदार्थ श्री. सत्चिदानंद (सचिन) रानडे, पुणे
#७) महाप्रसादानंतर आईसक्रीम: श्री.धनंजय रानडे, पुणे
#८) महाशिवरात्रीसाठी लागणारी फुले इ... श्री. अभय अरविंद रानडे, पुणे

**आवाहन मदतीचे :- पुढे नमूद केल्यापैकी एखाद्या गोष्टीसाठी पूर्णत: / अंशत: देणगी देऊन न्यासाला येणाऱ्या उत्सव खर्चात हातभार लावू शकता ...**

**<u>तपशीलवार</u> खर्चाचा अंदाज**

| Particulars | Qty | Amount Rs. |
|---|---|---|
| किराणा सामान | Misc. | 20,000.00 |
| तांदुळ / वरी तांदुळ | 50Kg | 4,000.00 |
| तेल | 50Kg | 5,000.00 |
| साखर | 110Kg | 5,000.00 |
| साबुदाणा | 50Kg | 4,000.00 |
| भाजी | Misc. | 5,000.00 |
| बटाटे | 100Kg | 3,000.00 |
| लोणचे | 5Kg | 1,000.00 |
| कणिक व बेसन | 40Kg+5Kg | 2,000.00 |
| दाणे | | 5,000.00 |
| पालखी वाजंत्री | | 4,000.00 |
| उत्सवातील चहा / कॉफी / नाष्टा इ. | | 35,000.00 |
| दुध | 200Lts | 13,000.00 |
| देणगी वगळता न्यासाला येणारा मांडव खर्च | | 40,000.00 |
| स्पीकर व रोषणाई खर्च | | 35,000.00 |
| उत्सव एकूण मजुरी खर्च | | 65,000.00 |
| बल्लवाचार्य | | 45,000.00 |
| लघुरुद्र, सत्यनारायण इ. गुरुर्जी दक्षिणा | | 20,000.00 |
| पाणी व्यवस्था | | 15,000.00 |
| वाहतूक खर्च | | 7,000.00 |
| Gas Cylinder /s | | 4,000.00 |
| विविध गुणदर्शन / कीर्तन इ. | | 20,000.00 |
| Misc. Expenses | | 14,000.00 |
| **TOTAL (Rs.)** | | **3,75,000.00** |

**देणगी थेट जमा करण्यासाठी न्यासाचे बँक खात्यांची तसेच UPI id व QR Code बाबत माहिती**

1. **SHRI VYAGHRESHVAR KULASWAMI PARIVAR**

(स्पेलिंग मध्ये किंवा मराठीत लिहिताना कुलस्वामी ऐवजी कुलस्वामिनी लिहले गेले नाही ह्याची खात्री करूनच व्यवहार करावा ही सूचना)

SB/Ac No. 1014330094, Central Bank of India, Deccan Gymkhana Branch, Pune. IFSC CODE: CBIN0280655

२. **UPI id : 11133810@cbin**

३. **QR Code**

SHRI VYAGHRESHVAR KULA

11133810@cbin

**ऋणनिर्देश :** आज रोजी पत्रक तयार करत असतानाच उत्सवासाठी एकूण तीन जणांकडून देणगी प्राप्त झाली आहे. **श्री. प्रकाश जी वैशंपायन यांनी लघुरुद्र पूजेचे यजमानपद स्वीकारून रु. २५,०००/- देणगी घोषित केली आहे.** डॉ. प्रसन्न रानडे यांनी रु. १०००/- तर सचिव धनंजय रानडे यांनी उत्सव काळात तसेच इतर वेळी वापरता येईल असा फ्रीझर (: शीतपेटी) देऊन उत्सवाची पायाभरणी केली आहे .. जय व्याघ्रेश्वर !!!.

**विशेष आभार : इ.स. २०२३-२४ या वर्षात उत्सव, जीर्णोद्धार, शैक्षणिक व इतर उपक्रमांसाठी केलेल्या आवाहनाला प्रतिसाद देऊन न्यासाला मदत करणाऱ्या सर्व सहृदय देणगीदारांचे न्यासातर्फे शतश: आभार ... जय व्याघ्रेश्वर !!!**

श्रींचे आशिर्वाद व भक्तजनांच्या सढळ व सहृदय दानीवृत्तीने हे कार्य यशस्वीरित्या संपन्न होत असते. आपल्या प्रतिसादाची दरवर्षी प्रमाणे यंदाही मिळेल तसेच आपला स्वतःहून सहभाग घ्याल असा खात्रीशीर प्रयत्न करू.

बहुत काय लिहीणे, आपणा सर्वांचा लोभ तर आहेच; तो वृद्धींगत व्हावा हीच श्री देव व्याघ्रेश्वराचे चरणी प्रार्थना !!

**जय व्याघ्रेश्वर !!!**

**उत्सव कुपन जपून ठेवणे गरजेचे आहे तसेच ते हस्तांतरणीय नाही हे लक्षात घ्यावे. कुपन असल्याशिवाय भोजन कक्षात प्रवेश दिला जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.**

**अध्यक्ष**
श्री शिरीष जोशी
**श्री. व्याघ्रेश्वर कुलस्वामी परिवार**

**सचिव**
श्री. धनंजय रानडे
**श्री. व्याघ्रेश्वर कुलस्वामी परिवार**

श्री. शिरिष ग. जोशी(अध्यक्ष) || श्री व्याघ्रेश्वर प्रसन्न || श्री जगदिश ग. रानडे(खजिनदार)
९०३५५८६११० ९८५०६६६५८९

# श्री व्याघ्रेश्वर कुलस्वामी परिवार

द्वारा : श्री धनंजय श्री रानडे, कार्यवाह
४ रमा माधव, १०५/२, नारायण पेठ, पुणे - ४११०३०.
फोन : (०२०) ९८२२२९५६१० / ९४२३१३८३६५ आसूद दूरध्वनी :

**व्रत सेवेचे - भक्तीचे - ज्ञानाचे**

Website : www.vyaghreshvar.com रजि नं.:एफ - २२१४ Email : svkp.pune@gmail.com

दि. ४ फेब्रुवारी २०२४

## वार्षिक सर्वसाधारण सभा

प्रति,
मा. सभासद,
श्री व्याघ्रेश्वर कुलस्वामी परिवार.

या पत्रकात नमूद केल्याप्रमाणे यंदाचे वर्षीची "सर्वसाधारण सभा" महाशिवरात्रीचे दिवशी; म्हणजे शुक्रवार दि. ०८/०३/२०२४ रोजी दु. ४.० वा. आसूद येथील न्यासाच्या भक्तनिवासात घेण्यात येईल. सभेच्या कामकाजाचे विषय खालीलप्रमाणे आहेत.....

०१. स्वागतपर प्रस्तावना - अध्यक्ष श्री. शिरीष गजानन जोशी.
०२. मागील सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे - सचिव श्री. धनंजय रानडे.
०३. नविन वर्षाच्या अंदाजपत्रकावर चर्चा करुन त्या अनुषंगाने त्यास सभेची मान्यता घेणे.
०४. भक्तनिवासातील सुधारणा, पाणी इ. मुलभूत प्रश्नांवर चर्चा करुन त्यावर निर्णय घेणे.
०५. मार्च अखेरीस न्यासाची कार्यकारिणी व विश्वस्त मंडळाची निवडणूक दिनांक ठरवणे तसेच निवडणूक अधिकारी नेमण्यास विद्यमान कार्यकारिणी व विश्वस्त मंडळास अधिकार देणे.
०६. अध्यक्षांचे परवानगीने आयत्या वेळचे विषय.
०७. आभार प्रदर्शन - श्री. विनायक वैशंपायन.

श्री. धनंजय श्रीकृष्ण रानडे (सचिव)
श्री. व्याघ्रेश्वर कुलस्वामी परिवार

वि. सू. :- सभा ठीक सा. ४.० वा सुरु होईल. गणसंख्या कमी असल्यास अर्धा तास सभा तहकूब करण्यात येईल व त्याच ठिकाणी सा. ४.३० वा. घेतली जाईल व त्यास गणसंख्येचे बंधन असणार नाही. सदर सभेत घेतले गेलेले निर्णय सर्वांवर बंधनकारक असतील.

आपणापैकी कोणाला प्रश्न विचारायचा असल्यास तो सुवाच्य हस्ताक्षरात लिहून पत्रकातील पत्त्यावर दि. ०१/०३/२०२४ पर्यंत पाठवा.